


क्षितिज झारापकर

kshitijzarapkar@yahoo.com

# जुन्या-नव्याचा अपूर्व संगम



'संगीत मत्स्यगंधा' वसंत कानेटकरांचे अजरामर नाटक. संपदा जोगळेकरांनी या कलाकृतीला धक्का न लावता नवा संच यशस्वीपणे सादर केलाय.

**'घरात** फुलला पारिजात', 'फुलाला सुगंध मातीचा', 'गरुडझेप', 'इथे ओशाळला मृत्यू', 'रायगडाला जेव्हा जाग येते', 'रंग उमलत्या मनाचे', 'सूर्याची पिल्ले', 'अखेरचा सवाल', 'प्रेमाच्या गावा जावे', 'वेड्यान', 'अश्रूंची झाली फुले', 'प्रेमा तुझा रंग कसा', 'लेकुरे उदंड झाली', 'तुझा तू वाढवी राजा', 'हिमालयाची सावली' ही नाटकांची नावं फक्त वाचली की, ही सगळी एकाच नाटककाराने लिहिली आहेत यावर विश्वास बसणं कठीण आहे. पण ही सगळी आणि आणखी बरीच अशी एकूण जवळपास चाळीस अजरामर नाटकं लिहिणारे जबरदस्त मराठी नाटककार म्हणजे वसंत कानेटकर. 'द गोवा हिंदू असोसिएशन' आणि 'नाट्यसंपदा' या संस्थांनी मिळून त्यांचं एक अप्रतिम संगीत नाटक आता पुन्हा रंगभूमीवर आणलेलं आहे - 'संगीत मत्स्यगंधा'.

जरी वर कानेटकरांच्या लोकप्रिय नाटकांची यादी दिली तरीही इथे 'संगीत मत्स्यगंधा'मधील लोकप्रिय नाट्यगीतांची यादी हवी. 'देवाघरचे ज्ञात कुणाला', 'गुंतता हृदय हे', 'साद देती हिमशिखरे', 'नको विसरू संकेत मीलनाचा', 'अर्थशून्य भासे मजला कलह जीवनाचा' आणि द सुपरहिट 'गर्द सभोती रान साजणी तू तर चाफेकळी' ही सगळी पदं कानेटकरांच्या एकाच 'संगीत मत्स्यगंधा' या नाटकात आहेत, पण कानेटकरांचा ग्रेटनेस यात नाही. ही सगळी गाणी 'संगीत मत्स्यगंधा'च्या पहिल्या दीड अंकात आहेत. पुढचा दीड अंक हा कानेटकर शैलीतील शब्द आणि संवाद यांची उधळण आहे. 'महाभारत'कार व्यासांच्या जन्माची कहाणी सांगणारी ही कथा पराशर-सत्यवतीच्या प्रणयापासून सुरू होऊन भीष्म आणि अंबिकेच्या टकरावापर्यंत येऊन पोहोचते. आज या तीन अंकी नाटकाची दोन अंकी आवृत्ती करताना मध्यांतराला भीष्मप्रतिज्ञा येते.

संपदा जोगळेकर-कुळकर्णी यांनी या कलाकृतीच्या ओरिजिनॅलिटीला धक्का न लावता आणि अत्यंत आदरपूर्वक दिग्दर्शन केलेलं आहे. दी गोवा हिंदू असोसिएशनच्या पहिल्या आवृत्तीतील नेपथ्यरचना जवळी तशीच ठेवून त्यांनी 'संगीत मत्स्यगंधा' सादर केलंय. पहिला भाग धीवर दशराजाच्या अंगणात गंगाकिनारी घडतो आणि दुसरा भाग हस्तिनापुरातील महालात. नाटकाची संगीतमयता लक्षात घेऊन गरजेचे असणारे गायक नट त्यांनी ऑडिशन्सद्वारे शोधून काढले आहेत. त्यात पराशराच्या भूमिकेत नचिकेत लेले आणि सत्यवती झालेली केतकी चैतन्य हे दोघेजण ही सगळी नाट्यगीतं कमालीच्या तयारीने पेश करतात. संपदाने त्यांच्याकडून करून घेतलेली मेहनत आपल्याला पदापदातून दिसत राहते. संगीतातही आपल्याला पं. जितेंद्र अभिषेकींची प्रतिभा अनुभवायला मिळते. शुद्ध संगीत नाटकाच्या ऑर्गन आणि तबल्याच्या साथीवर प्रकटणार नाट्यसंगीत 'संगीत मत्स्यगंधा'मध्ये अनुभवायला मिळतं. एकाहून एक सुंदर गीतांची मेजवानीच आपल्या पुढ्यात वाढली जाते आणि जाणत्या नाट्यसंगीत प्रेमींची निखळ दाद याला मिळते.

आजच्या 'संगीत मत्स्यगंधा'मध्ये संगीताची मेजवानी जरी मध्यांतरापूर्वीच संपत असली तरी उत्तरार्धात तीक्ष्ण संवाद आणि शब्दांची आतषबाजी करायला भीष्म सिद्ध होतो. कानेटकरांनी हे नाटक तसंच योजलं आहे. भीष्माच्या भूमिकेत राहुल मेहेंदळे आपल्या संवादफेकीच्या कसबाने भाव खाऊन जातो. राहुल हा एक गुणवंत नट आहे हे त्याने यापूर्वी सगळ्या माध्यमांमधून सिद्ध केलंय. आपल्याला मिळालेल्या भूमिकेचा स्ट्रॉंग पॉइंट काय हे ओळखू शकणारे नट कोणतीही भूमिका यथार्थपणे सादर करू शकतात. राहुल भीष्म असाच यथार्थ सादर करतो. त्याला यात सर्व परीने साथ देते ती अंबा झालेली पूजा रायबागी. भीष्म आणि अंबा या संगीत नाटकातल्या दोन गद्य भूमिका आहेत. राहुल आणि पूजा या दोघांनी त्या उत्तम वठवल्याने 'संगीत मत्स्यगंधा'चा बॅलन्स छानच साधला गेला आहे. चंडोल आणि धीवराच्या दोन अन्य गद्य भूमिकांमध्ये अमोल कुलकर्णी आणि संजीव तांडेल योग्य कामगिरी करतात.

मूळ नाटकात असणारी महाराज शंतनू ही व्यक्तिरेखा येथे वगळण्यात आली आहे. काही अन्य प्रसंग वगळण्यात आले आहेत. 'नको विसरू संकेत मीलनाचा' हे पद पराशराच्या जाण्यानंतर एका ड्रीम सिक्वेन्समध्ये आणलं गेलंय. मूळ नाटकात या गीतादरम्यान युवराज देवव्रत सत्यवतीला पराशराच्या बाहुपाशात पाहतो. हा प्रसंग या स्वप्नदृश्यात येत नाही. आता यामुळे काही महत्त्वाचे संदर्भ जातात की काय असा प्रश्न येतो. पण सत्यवतीला आपल्या वडिलांकरिता मागणी घालायला देवव्रत येतो तेव्हा तिला तो "माते" म्हणून संबोधतो. यावर सत्यवती "मी अद्याप कुणाचीच माता नाही" म्हणते. याला प्रत्युत्तर म्हणून देवव्रत "नाही?" असा प्रश्नात्मक उद्गार काढताना तो आपल्या संवादफेकीतून राहुल मेहेंदळेंनी अधोरेखित करून संदर्भ न हरवण्याचं कौशल्य दाखवलंय. नंतर नाटकाच्या क्लायमॅक्समध्ये हुशारीने राजमाता सत्यवतीची समजूत काढताना भीष्म तिला पराशराची प्रेयसी म्हणून संबोधित करून तिच्या आणि पराशराच्या पुत्राला म्हणजे व्यासाला आणून कुलवंश पुढे चालवण्याचा मार्ग तयार करतो. या "नाही"मध्ये संपदा जोगळेकर-कुळकर्णी यांची हुशारी आहे. आजच्या नाट्यगृहांच्या वेळापत्रकात बसवण्याच्या प्रयत्नांमध्ये जुन्या नाटकाचा काही भाग वगळावा लागतो ही वस्तुस्थिती आहे. पण तो करत असताना मथितार्थ आपण कसा हरवू द्यायचा नाही याचं हे एक फार चांगलं प्रात्यक्षिक आहे. हे हरवलं असतं तर भीष्म अंबेला ती जेव्हा शिखंडी रूपात समोर येईल तेव्हा स्वतःच्या मृत्यूचं वरदान देऊच शकला नसता. संपदा आणि राहुल या दोघांनी योजलेला हा "नाही" म्हणूनच इतका महत्त्वाचा होतो.

एकंदरीत 'संगीत मत्स्यगंधा' या कमालीच्या लोकप्रिय आणि सिद्धहस्त लेखणीतून अवतरलेल्या अभिजात संगीत नाटकाचा सगळा आब, रुबाब राखून केलेली पुनर्निर्मिती म्हणून आजची दुसरी आवृत्ती लक्षणीय आणि प्रेक्षणीय आहे.

- **दर्जा** : ★★½
- **नाटक** : संगीत मत्स्यगंधा
- **निर्मिती** : दी गोवा हिंदू असोसिएशन आणि नाट्यसंपदा कलामंच
- **निर्मितीप्रमुख** : अनंत पणशीकर
- **लेखक** : प्रा. वसंत कानेटकर
- **संगीत** : पं. जितेंद्र अभिषेकी
- **संगीत मार्गदर्शन** : रामदास कामत
- **पार्श्वसंगीत** : अशोक पत्की
- **नेपथ्य** : सचिन गावकर
- **प्रकाशयोजना** : शीतल तळपदे
- **वेशभूषा** : करिष्मा नानावटी
- **संगीतसाथ** : मकरंद कुंडले, केदार भागवत, सुहास चितळे, धनंजय पुराणिक
- **कलाकार** : केतकी चैतन्य, पूजा रायबागी, नचिकेत लेले, संजीव तांडेल, शशी गंगावणे, अमोल कुलकर्णी, राहुल मेहेंदळे.